CMYK
■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं. दैनिक ■ मराठी ■ वर्ष 2 रे ■ अंक 159 ■ मंगळवार, 25 फेब्रुवारी 2025 ■ आरएनआय-एमएमएचएमएआर/2023/83964 ■ किंमत रू. 3 ■ पाने 04
■ BEED (MAHARASHTRA) ■ DAILY EVENING ■ MARATHI ■ YEAR 02 ■ ISSUE 159 ■ TUESDAY 25 FEBRUARY 2025 ■ RNI:MAHMAR/2023/83964 ■ PRICE- 3 RUPEES ■ PAGES 04

## तापमान ३ ते ५ अंश सेल्सिअसने वाढले: हवामान विभागाचा कोकण, गोव्याला यलो अलर्ट

**मुंबई/प्रतिनिधी** : फेब्रुवारी महिना आता जवळपास संपत आला आहे. त्यामुळे आता राज्यात उष्णतेची चाहूल लागण्यास सुरुवात झाली. थंडी अद्याप संपलेली नसताना देखील कोकणपट्ट्यात सामान्य तापमानाच्या तुलनेत तीन ते पाच अंश सेल्सिअस उष्णतेत वाढ झाल्याची नोंद हवामान विभागाने केली आहे. त्यामुळे आज सोमवार २४ फेब्रुवारी आणि मंगळवार २५ फेब्रुवारी या दोन दिवसांसाठी हवामान विभागाने कोकणासह गोव्याला तापम ानाचा येलो अलर्ट जारी केला आहे.

MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक : दिपक थोरात

## मढी यात्रेत मुस्लिम समाजाची दुकाने लागणार नाहीत, मढी ग्रामपंचायतीचा ऐतिहासिक निर्णय

**अहिल्यानगर/प्रतिनिधी** : जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील मढी ग्रामपंचायतीने काल झालेल्या ग्रामसभेत एक ठराव सर्वानुमते मंजूर केलाय. या निर्णयाने राज्यात नव्या वादाला तोंड फुटण्याची चिन्हे निर्माण झालीत. राज्यात भटक्यांची पंढरी म्हणून प्रसिद्ध असलेली पाथर्डी तालुक्यातील मढी येथील चैतन्य कानिफनाथ महाराजांची यात्रा पुढील महिन्यापासून सुरू होत आहे. मात्र यंदा या यात्रेत मुस्लिम सम ाजाच्या व्यावसायिकांना बंदी घालण्याचा ठराव ग्रामसभेने संमत केलाय.

## बीड नगर परिषदेच्या वसुली विभागाच्या तिजोरीतून गणेश पगारे यांनी ९५ कोटी रुपये बोगस गुत्तेदारांचे बिल काढण्यात वापरले

# मुख्याधिकारी निता अंधारेनी उत्तर द्यावं?

**मुख्याधिकारी नीता अंधारे अकाउंटंट गणेश पगारेनी कोट्यावधी रुपयाची नातेवाईकांच्या नावाने प्रॉपर्टीची खरेदी झाल्याची ही नागरिकांतून चर्चा?**

**नीता अंधारे गणेश पगारे धुतल्या तांदळासारखे असाल तर एखादी पत्रकार परिषद घेऊन तक्रारदारांचे प्रश्नाचे उत्तर द्याव?**

**बीड नगर परिषदेत कोणतेही टेंडर असेल तर गणेश पगारेने निता अंधारे याची अंधारातून पार्टनर तर दुसरा गुत्तेदार असेल तर नीता अंधारे पंचवीस टक्के गणेश पगारे १५ टक्के रेट फायनल अनेक कार्यकर्ते नागरिकांच्या तोंडून चर्चा?**

**बीड नगर परिषदेमध्ये ३८ कोटी रुपयांची वसुली विभागातून गणेश पगार यांनी कशा पद्धतीने व कुठे खर्च केले याचाही उत्तर द्यावं ३८ कोटी रुपयांची तक्रार असताना सुद्धा मुख्याधिकारी नीता अंधारे गप्प का तर मुख्याधिकारी नीता अंधारे ह्या कार्यकाळात व अगोदर गणेश पगारेनी ९५ कोटी रुपये कसे खर्च केले याचे उत्तर मुख्याधिकारी मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी मुख्य अधिकारी यांना त्यांनी देणे गरजेचे आहे?**

**बीड नगर परिषदेमध्ये विविध विभागाच्या लेखा शीर्षकातून गणेश पगारे नीता अंधारे यांनी २०० कोटी रुपयांचा घोटाळा रीतसर केला?**

**बीड नगर परिषदेमध्ये वेगवेगळ्या लेखा शीर्षकातून बांधकाम विभागातून नीता अंधारे गणेश पगार यांनी सत्तेतील नेते पदाधिकाऱ्यांच्या घशात १०० कोटी पेक्षा जास्त निधी घातला?**

**बीड नगर परिषदेत मुख्याधिकारी नीता अंधारे गणेश पगारे अनेक फायदे स्वत: च्या घरी नेऊन ठेवलेल्या?**

**बीड नगर परिषद मध्ये न बसताच मुखधिकारी नीता अंधारे स्वत:च्या घरी तर गणेश पगारे ही स्वत:च्या घरी फाईल घेऊन जातात नियम धाब्यावर बसून बीड नगरपरिषद दोघांच्या घरी चालविणे कितपत योग्य बीड शहरातील जनतेला पडलेला प्रश्न? .**

**बीड/प्रतिनिधी : बीड नगर परिषदेमध्ये प्रशासक नियुक्त झाल्यानंतर अकाउंटंट गणेश पगारे मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी कोट्यावधी रुपयाचा भ्रष्टाचार केलेला आहे. यांचा भ्रष्टाचार हा २०० कोटी पेक्षा जास्त असल्याची पुरावे व तक्रारी तशा तक्रारदारांनी पुराव्यानिशी वरिष्ठांकडे केलेले आहेत. परंतु बीडच्या नगरपरिषद मध्ये नीता अंधारे व गणेश पगारे रोखणारा कुणीच नाही बीडचे आमदार संदीप क्षीरसागर योगेश क्षीरसागर ही सुद्धा नीता अंधारे गणेश पगारेच काहीच वाकड करू शकत नाहीत अशी चर्चा आता बीड शहरामध्ये होत आहे.**







यातच बीड नगर परिषदेच्या वसुली विभागातील गणेश पगारे यांनी ९५ कोटी रुपयांचा अपहार केल्याची चर्चा बीड बीड नगर परिषदेतील कर्मचारी व अधिकारी व नागरिक हे करत आहेत नागरिक कर्मचारी हे निताअधारे व गणेश पगार यांना अक्षरशः कंटाळून गेलेले आहेत यामध्ये बीड शहरातील १००० बांधकाम परवाने नियम धाब्यावर बसून निता अंधारे गणेश पगारे यांनी परवाने दिलेले आहेत ५० हजार ते दहा लाखापर्यंत लाच घेण्याचा प्रकार बीड नगरपरिषद मध्ये चालू आहे. बीड नगर परिषदेतील वेगवेगळ्या विभागामध्ये नीता अंधारे व गणेश पगारे सत्ता चालू ठेवून त्या ठिकाणी आपले वर्चस्व हे बीड नगर परिषदेत राज्यकर्त्या राजकीय नेत्यांपेक्षा जास्त मुखधिकारी नीता अंधारे अकाउंटंट गणेश पगारे आती जास्त प्रमाणामध्ये या ठिकाणी आपली वचक दाखवून राजकीय नेत्यांना लाजवेल अशा पद्धतीने भ्रष्टाचार उघड पणे करत आहेत नीता अंधारे गणेश पगारे यांच्या कार्यकाळातील अवैध बांधकाम परवाने तात्काळ रद्द करण्यात यावी कारण या अगोदर सुद्धा बीड नगर परिषदेचा एक अभियंता लाच घेताना पकडला होता ही लाच ९ ते १० लाख रुपयांची होती त्यामुळे नीता अंधारे गणेश पगारे यांची व नातेवाईक याच्या ही प्रॉपर्टीचे सखोल चौकशी होणे गरजेचे आहे. बीड नगर परिषदेमध्ये गणेश पगारेच्या ३८ कोटी रुपयांच्या वसुली विभागातील एक तक्रार वरिष्ठांकडे चालू आहे त्या तक्रारीमध्ये गणेश पगारे दोषी आहे तर एका तक्रारदाराने संबंधित तक्रार ही दिली त्या तक्रारीत सुद्धा चौकशी समितीने दोषी अहवाल तयार केलेला आहे परंतु नीता अंधारे या संबंधित चौकशी अहवालात ती अधिकारी कर्मचारी या नियुक्त केलेल्या परिषदेतील अधिकारी कर्मचारी यांनी गणेश पगारेच्या विरोधामध्ये अहवाल तयार केलेला आहे. परंतु नीता अंधारे व गणेश पगार आहेत त्यांच्याकडे दादागिरी करून त्यांना अहवाल पाठवून देत नाहीत जिल्हाधिकारी व महाराष्ट्र शासनाने गणेश पगारेच्या विरोधामध्ये अहवाल मागवला असताना तक्रारीच्या अहवाल नीता अंधारे का दाबून ठेवत आहेत तर गणेश पगारेच्या मुलगा व मुलगी हे बीड नगर परिषदेमध्ये नोकरीला आहेत परंतु त्या ठिकाणी जात धर्म बदलून वंशावळ तयार करण्यात आल्याची ही बोलले जात आहे तर यावेळी मात्र बीड नगर परिषदेमध्ये गणेश पगारे चा मुलगा नोकरीला असताना गुत्तेदारी ही करतो स्वतःचे वाहन ही बीड नगर परिषदेला स्वच्छता विभागाला लावतो व बिल उचलतो काही मुद्दे हे जनतेने आता बाहेर काढलेले आहेत त्यामुळे बीड नगर परिषदेमध्ये भ्रष्टाचाराचा कळस २०० कोटी पेक्षा जास्त गेला असला तरी वसुली विभागातील ९५ कोटी रुपयांचा अपहार गणेश पगारेनी कसा केला आहे .? गणेश पगारेच्या सहिने आज पर्यंत कातीव रूपयांची वसूली व नगर परिषदेच्या खर्च चा अहवाल याचा खुलासा बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांनी मांडावा बीड नगर परिषदेतील भ्रष्टाचाराचा पाढा हा जनतेसमोर पुढील अंकात होणार आहे

## मुख्याधिकारी नीता अंधारे, गणेश पगारे यांच्या कार्यकाळात भ्रष्टाचार संदर्भात उपस्थित झालेले प्रश्न?

१) मुख्याधिकारी नीता अंधारे मुख्यमंत्री म्हणून रुजू झाल्यापासून आजपर्यंत त्यांच्या कार्यकाळामध्ये सर्व कामाची सखोल चौकशी होणे गरजेचे.

२) मुख्याधिकारी नीता अंधारे रुजू झाल्यानंतर त्यांच्या कार्यकाळामध्ये शहराच्या स्वच्छतेवर खर्च करण्यात आलेल्या कामाचा निधी व गुत्तेदार टेंडर कोणाला दिले व कितीचे दिले.

३) मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्या कार्यकाळात बीड शहरात देण्यात आलेल्या सर्व बांधकाम परवाना व गुंठेवारी विभागामध्ये मोठा आर्थिक व्यवहार झाल्याने हजारो बांधकाम परवाने बोगस याची सफल चौकशी होणे गरजेचे.

४) बीड नगरपरिषद मार्फत पाणीपुरवठा मध्ये २०२२ ते २०२५आजपर्यंत करण्यात आलेल्या निधीची व खर्चाचा सविस्तर तपशील तपासणी करते.

५) २०२२ ते२०२५ आजपर्यंत बीड नगर परिषदेच्या विविध विभागाच्या कर्मचाऱ्यांच्या नावा देण्यात आलेल्या बिलांची सखोल चौकशी होणे गरजेचे

६) २०२२ ते एक जानेवारी २०२५ पर्यंत बीड नगरपरिषद करण्यात आलेल्या विविध विकासकामे व रस्ते रोड सिमेंट रोड नाली व डाग रिपेरिंगच्या कामाची गुणवत्ता व बिलांची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

७) बीड नगर परिषदेत अंतर्गत पंतप्रधान आवास योजना रमाई घरकुल योजना ते फेस एक मध्ये बीड नगर परिषदेकडून काही इनामी जमिनी घरकुल मंजूर करण्यात आल्या बाबत त्याची सखोल चौकशी व बीड नगरपरिषद मार्फत राबविण्यात आलेल्या घरकुल योजनेची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे

८) १२ डिसेंबर २०२४ च्या आदेशानंतर दहा सफाई कामगारांना पुन्हा बीड कलेक्टर

९) स्वर्गीय विनायक रावजी मेटे यांच्या प्रयत्नातून आणलेल्या विशेष निधी करण्यात आलेल्या बोरस्प्रेत प्रकरणात काही ठिकाणी बोरस्प्रेत न करता देण्यात आलेले विलाप्रकरणी संबंधित विभागाची अभियंता व मुख्य अधिकारी यांची निलंबनाची कारवाई करावी व सफल चौकाची होणे बाबत

१०) बीड नगर परिषदेत अनुकंपा नियम व लाड समितीचा दुरुपयोग करून नोकरीची खरेदी विक्री करण्यात आलेली प्रकरणाची सखोल चौकशी होणे बाबत

११) कर्मचारी निवृत्त झाल्यानंतर शासनाकडून तेवढीच पगार रक्कम मागण्यात आल्याप्रकरणी २०२२ ते २०२५ पर्यंतचे पगार व निवृत्त कर्मचाऱ्यांचे यादीप्रमाणे चौकशी होणे

१२) बीड नगर परिषदेच्या वसुली विभागात नगरपरिषदेची स्वतःची झेरॉक्स मशीन असताना झेरॉक्स च्या नावाखाली देण्यात आलेल्या आठ लाख दोन आठ लाखाच्या दोन बिलांची सखोल चौकशी होणे गरजेचे आहे.

१३) मालमत्ता धारकांकडून वसूल विभागात दस्तावेज भरण्यात आलेल्या रकमेच्या अप्रतिम प्रकरणात तारीख न्याय वाटणाऱ्या पावत्या व वसूल विभागाकडून नगरपरिषदेत भरण्यात येणाऱ्या रकमेची सकल चौकशी

१४) मालमत्ता कर आकारणी प्रकरणात नगर रचना विभाग नगर परिषद बीड कडून टिप्पणी न घेता वसूल विभागात केली जाणारी कर आकारणीची सफल चौकशी

१५) बीड शहरातील झम झम कॉलणी प्रभागात मुख्य रस्त्याचे कामाची सुरुवात चौकशी व त्यासाठी देण्यात आलेली चाळीस लाख रुपयाची रक्कम त्याबद्दल सखोल चौकशी आहे

१६) बीड नगरपरिषद मार्फत २०२२ ते २०२५ पर्यंत शहरात केले जाणारे रस्ते नाली व विविध विकास कामाच्या गुणवत्ता व बिलाची सखोल चौकशी

१७) ज्या कर्मचाऱ्याविरुद्ध सेवा बढतर्फेचा आदेश नगर परिषदेच्या विरोधात ठराव व विविध लेखापरीक्षणात आक्षेप असताना त्या कर्मचाऱ्यांना पुन्हा बीड नगर परिषदेत करून घेतल्याबद्दल चौकशी व संबंधित कर्मचाऱ्यांची बडतर्फी

CMYK

## गझल सम्राट ; पंकज उधास

आपल्या मलमली आवाजाने गझल गायकीला वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे संगीत रसिकांचे आवडते गझल गायक पंकज उधास यांचा उद्या पहिला स्मृतिदिन. मागील वर्षी २६ फेब्रुवारी २०२४ रोजी पंकज उधास यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने संगीत विश्र्वातील एक तारा निखळून पडला. पंकज उधास हे भारतातीलच नाही तर जगातील एक प्रमुख गझल गायक म्हणून ओळखले जात होते. १९८६ साली आलेल्या नाम चित्रपटातील त्यांनी गायलेल्या चिठ्ठी आई है.... आई है...या गाण्याने ते घराघरात पोहचले. हे गाणे आजही तितकेच लोकप्रिय आहे. नाम चित्रपट यशस्वी होण्यात या गाण्याचा खूप मोठा वाटा होता. या गाण्यांनंतर त्यांनी हिंदी चित्रपटात अनेक गाणी गायली. घायल, साजन, ये दिल्लगी, फिर तेरी कहाणी याद आई, मोहरा यासारख्या चित्रपटातून त्यांनी गाणी गायली. त्यांनी गायलेले ना कजरे की धार, आज फिर तुमपे प्यार आता है, जिये तो जीये कैसे, और आहिस्ता अशी कितीतरी गाणी लोकप्रिय झाली व ही सर्व गाणी गाजली ती त्या गाण्यातील अर्थपूर्ण शब्दांनी आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजाने. चित्रपटातील त्यांनी गायलेले गाणी लोकप्रिय झाली तरी त्यांची ओळख ही गझल गायक म्हणूनच राहिली. त्यांचे मोठे बंधू मनहर उधास हे देखील प्रख्यात गझल गायक आहेत त्यांनीच पंकज उधास यांना पहिल्यांदा स्टेजवर गझल गाण्याची संधी दिली. १९७१ साली त्यांनी कर्मा या चित्रपटात पहिल्यांदा पार्श्र्वगायन केले मात्र त्यांची दखल कोणी घेतली नाही त्यामुळे ते कॅनडाला निघून गेले. तिथे त्यांनी छोट्या मोठ्या समारंभात गाण्यास सुरुवात केली. तिथे ते स्टेज शो देखील करू लागले. त्यांचे स्टेज शो ही लोकप्रिय होऊ लागले. भारतात परतल्यावर त्यांनी अनेक स्टेज शो केले मात्र चित्रपटात त्यांना म्हणावी तशी संधी मिळत नव्हती कारण तो जमाना मोहंमद रफी आणि किशोर कुमार यांचा होता. १९७९ साली त्यांना जवाब या चित्रपटातील मितवा रे मितवा... हे गाणे गाण्याची संधी मिळाली या संधीचे त्यांनी सोने केले. हे गाणे लोकप्रिय झाल्यावर त्यांनी गझल क्षेत्रात करियर करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान त्यांनी अनेक गझल गायली. पंकज उधास यांनी एक से बढकर एक गझल गात रसिकांना मंत्रमुग्ध केले. १९८० साली त्यांच्या गाण्याचा पहिला अल्बम आला. त्यानंतर त्यांच्या गाण्यांचा धडाका सुरू झाला. १९८१ साली मुकर्रर, १९८२ साली तरनुम, १९८३ साली महाफिल, १९८५ साली नायाब हे त्यांचे अल्बम आले. या अल्बम मधील सर्व गाणी रसिकांना आवडली. त्यांच्या गझला इतक्या लोकप्रिय झाल्या की रसिकांनी त्यांना गझल सम्राट ही पदवी दिली. सारं काही विसरायला लावणाऱ्या त्यांच्या गझला आजही रसिक गुणगुणताना दिसतात. त्यांनी आपल्या आवाजाने गझल क्षेत्राला आणि गझल गायकीला ऊर्जितावस्था मिळवून दिली. गझल गायकी लोकप्रिय करण्यात त्यांचा सिंहाचा वाटा होता. गझल गायन आणि संगीत क्षेत्रात त्यांनी भरीव योगदान दिले. त्यांच्या याच योगदानासाठी भारत सरकारने त्यांना पद्मश्री हा मानाचा पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. त्यांच्या निधनाने संगीत आणि गायन क्षेत्राची कधीही भरून न निघणारी हानी झाली आहे. गझल सम्राट पंकज उधास यांना पहिल्या स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

# वेश्या व्यवसायावर AHTU व LCB पथकाचा छापा

## एपीआय वर्षा गव्हाडे व महिला पोलीस दिपाली सावंत महिला पोलीस कर्मचारी चे धाडसी कारवाई



**बीड/प्रतिनिधी :** आज दिनांक २४/०२/२०२५ रोजी शिवाजी नगर येथे सह्याद्री हॉटेलचे विरुद्ध दिशेचे गल्लीत हॉटेल किनारा जवळ एक इसम मेसचे नावा खाली त्याची पत्नी व एक खाजगी इसम यांचे मदतीने त्याचे राहते घरात महीलांना बोलवुन वैश्या व्यवसाय करत असल्याची माहिती बीडच्या AHTU पथकाला मिळाली त्यावरून AHTU पथकाच्या प्रभारी अधिकारी वर्षा व्हगाडे यांनी ही माहीती वरीष्ठांना दिली. मा. पोलीस अधीक्षक यांनी LCB चे पोलीस निरीक्षक संतोष घोडके व AHTU पथकास आदेश दिल्या-नंतर रेडचे नियोजन करण्यात आले. त्यावरून दोन पंच व AHTU स्टाफ, डमी ग्राहक हे शिवाजीनगर नगर येथे आले व तेथे डमी ग्राहकाने थुंकून इशारा करताच पथकाने रेड मारली. त्यावेळी तेथून बीड जिल्हयातील तीन व पुणे जिल्हयातील १ महीला अशा चार महीला मिळून आल्या.

तसेच आरोपी राजेंद्र प्रभाकर मुळूक वय-५०, त्याची पत्नी ज्योती राजेंद्र मुळुक वय-३५, दोघेही राहणार शिवाजी नगर व खाजगी इसम उमेश सुनिलकुमार पारीख रा. जालना रोड, बीड यांचे विरुद्ध पोलीस स्टेशन शिवाजी नगर येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरील कार्यवाही मा. पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी विश्र्वांबर गोल्डे यांचे मार्गदर्शना खाली पोलीस निरीक्षक संतोष घोडके, AHTU पथकाच्या API वर्षा व्हगाडे, महीला अंमलदार शोभा जाधव, अनिता दगडखैर, दिपा सावंत, शालीनी उबाळे, अनिता खरमारे मनिजा खरमाटे, सविता सोनवणे, पुरूष अंमलदार अशोक शिंदे, संजय सुरवसे सुभाष पवार यांनी केली व संबंधित दोन पुरुष आरोपी व २ महीला आरोपी यांचे विरुद्ध पोलीस ठाणे शिवाजी नगर येथे अनैतिक मानवी प्रतिबंध अधिनियम कायदया अन्यये सरकार तर्फे, API वर्षा व्हगाडे यांनी फिर्यादी होवुन गुन्हा दाखल केला आहे.

## २७ फेब्रुवारी रोजी समाजवादी पक्षाची जिल्हा आढावा बैठक; प्रदेश महासचिव परवेज सिद्दीकी, डॉ. रऊफ आणि डॉ. जोशी यांची प्रमुख उपस्थिती

**बीड/प्रतिनिधी :** समाजवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष तथा विद्यमान आमदार अबु आसीम आझमी यांच्या आदेशाने समाजवादी पक्ष राज्यात आगामी स्थानीक स्वराज्य संस्था निवडणुक लढविण्याची तयारी करत आहे. याच अनुशंगाने राज्यात पक्षाचे संघठन मजबुत करण्यावर लक्ष देण्याचे काम केले जात असुन याकरीता राज्यस्तरीय विशेष समिती तयार करण्यात आली असुन ही समिती राज्यभराचा दौरा करून जिल्हा आढावा घेत आहे. या निमित्ताने दि. २७ फेब्रुवारी गुरूवार रोजी बीड जिल्हा समाजवादी पक्षाचा आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले असुन या बैठकीत समाजवादी पक्षाचे प्रदेश महासचिव परवेज सिद्दीकी नागपुर, डॉ. अब्दुल रऊफ औरंगाबाद आणि डॉ. जोशी पाटोतकर नांदेड हे उपस्थित राहणार असुन यांच्या मार्गदर्शनात बीड जिल्हा समाजवादी पक्षाचा आढावा घेवुन सदस्य नोंदणीबाबत धोरणात्मक निर्णय घेतले जाणार आहे. ही बैठक समाजवादी पक्षाचे जिल्हा कार्यालय बशीरगंज या ठिकाणी दु.४ वा. आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत जिल्ह्यातील शहर, तालुका व जिल्हास्तरीय सर्व पदाधिकारी व सदस्य यांना उपस्थित राहणे अनिवार्य असुन या बैठकीत कार्याचा आढावा घेवुन पद वाटप करण्यात येणार आहे. म्हणुन समाजवादी पक्षाचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन जिल्हाध्यक्ष मोहम्मद खमरूल ईमान खान यांनी केले आहे.



## अवैध दारु वाहतुकीवर परळी पोलीसांची कारवाई देशी विदेशी दारुची चोरटी वाहतुक रोखली



**परळी /प्रतिनिधी :** आज दिनांक २५/०२/२०२५ रोजी पहाटे ०४:०० वाजेच्या सुमारास परळी शहर पोलीसांना गोपनीय माहीती मिळाली की, एक इसम हा त्याच्याकडील टाटा इंडीका कारमधुन अवैध दारुची वाहतुक करीत असल्याची माहीती मिळाली होती. मिळालेल्या माहीतीची खात्री करण्यासाठी परळी शहरचे पथक शासकीय वाहनाने रवाना झाले असता, अंबाजोगई रोडकडुन एक चारचाकी येतांना पथकाला दिसली. पोलीसांनी सदर वाहनास थांबवीण्याचा प्रयत्न केला असता पोलीसांना पाहुन सदर इसम हा त्याची कार घेवुन पळु लागला. त्यावेळी परळी शहरच्या पथकास सदर वाहनावर संशय बळावल्याने त्यांनी सदर वाहनाचा पाठलाग केला असता सदर इसम याने ४:३० वाजच्या सुमारास परळी शहरातील आझाद चौकात त्याच्याकडील टाटा इंडीका कार सोडुन पळुन गेला. पोलीसांनी सदर गाडीची झडती घेतली असता सदर टाटा इंडीका कार क्रमांक चक२३ ६५८० मध्ये देशी विदेशी दारुचे एकुण २१ बॉक्स मिळुन आले. पोलीस पथकाने रुपये १,१४,३३६०/-किंमतीचे देशी विदेशी दारुचे २१ बॉक्स व रुपये ३,००,०००/- किंमतीची टाटा इंडीका कार क्रमांक चक२३ ६५८० असा एकुण ४,१४,३६०/- रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस स्टेशन परळी शहर येथे टाटा इंडीका कारच्या चालका विरुद्ध गुन्हा दाखल केला असुन तपास परळी शहर पोलीस करीत आहेत. फरार आरोपीचा शोध सुरू आहे. नागरीकांना अवैध धंद्यांबाबत माहीती द्यायची असल्यास त्यांनी ठठ उेवश स्कॅन करुन माहीती द्यावी. जेणेकरुन पोलीसांना अवैध धंद्यांवर प्रभावी कारवाया करता येईल. तसेच माहीती देणाराचे नाव, ओळख व मोबाईल क्रमांक गुप्त ठेवले जाईल.

सदरची कामगीरी पोलीस अधीक्षक श्री. नवनित काँवत (भा.पो.से.), अपर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, पोलीस निरीक्षक श्री. रघुनाथ नाचण यांचे मार्गदर्शनाखाली पोहवा/१२२४ बालाजी दराडे, पोहवा/५६२ भास्कर केंद्र, पोहवा बापु नागरगोजे, पोहवा/१६२० सुरज गुट्टे, पोना/१९१८ गोविंद भताने, पोकॉ/१२६१ रामकिसन रेडेवाड, पोकॉ/१३१३ पंडीत पांचाळ यांनी केली आहे.

## साबला येथे महाशिवरात्री निमित्त स्वच्छता अभियान




**केज /प्रतिनिधी :** केज तालुक्यातील मौजे साबला येथे उत्तरेश्वर महाराज यांच जागृत देवस्थान असल्यामुळे येथील तरुण मित्रमंडळींनी स्वच्छता अभियान राबवलं . त्याची सुरुवात श्रीराम भक्त हनुमान महाराज मंदिर ते उत्तरेश्वर महाराज जागृत देवस्थान पर्यंत चा रस्ता व मंदिर परिसरातील पूर्ण स्वच्छता करण्याचं काम तरुणांनी पूर्ण केलं. तसेच गेल्या अनेक वर्षांपासून साबला येथील तरूण मित्रमंडळी साबला या गावात नेहमी कोणत्यानं कोणत्या कारणाने गावात स्वच्छता अभियान राबवत आहेत.

गावातील तरुणाचं असं मत आहे माझा गाव , स्वच्छ गाव माझा गाव , सुंदर गाव या प्रमाणे गावातील तरुण मित्रमंडळी या अभियानात सहभागी होतात . आणि स्वच्छता अभियान राबवण्याचे काम करतात. या मध्ये आदर्श शिक्षक नरहरी काकडे, ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , पोपट काकडे , माजी उपसरपंच काशिनाथ नाईकनवरे , इंजिनियर महेशराव काकडे , राहुल मुळे , गणेश कटारे , लखन राऊत , राजेभाऊ काकडे , वसंत नाईकनवरे , संदिपान काकडे , अनंत नाईकनवरे , अनिल भोसले , सदाशिव काकडे , जालींदर मुळे इत्यादी तरूण मित्रमंडळींनी या स्वच्छता अभियानात सहभाग नोंदवला आहे .

## उष्माघाताचा पहिला बळी सांगलीत

**सांगली/प्रतिनिधी :** मार्च महिना मध्यावर आला की उन्हाळ्याची चाहुल लागते, होळी सणात थंडी जळून जाते अन् उन्हाळा सुरू होतो असे जुने-जाणते सांगत असतात. मात्र, अलिकडे तिन्ही ऋतूंमध्ये बदल झाल्याचं पाहायला मिळते. पावळ्यात पाऊस नक्षत्रानुसार पडतच नाही, तर थंडीच्या ४ महिन्यात थंडीचा तेवढासा प्रभाव दिसून येत नाही. आता, उन्हाळाही लवकरच सुरू झाल्याचं पाहायला मिळत आहे. फ `ब्रुवारी महिन्यातच सूर्य आग ओकताना दिसून येत असून सांगली जिल्ह्यात यंदाच्या उन्हाळ्यातील उष्माघाताच पहिला बळी झाल्याची घटना समोर आली आहे.

# स्थानिक गुन्हे शाखा बीड ने नवगण राजुरी मधे चार लाखाचा गुटखा व पानमसाला मुद्देमाल पकडला

**बीड/प्रतिनिधी :** दिनांक २४/०२/२०२५ रोजी सपोनी विजयसिंह जोनवाल, पो उप नि महेश विघ्ने, पो.हवा. महेश जोगदंड, पोहावा. तुषार गायकवाड, पो हवा पठाण , बप्पासाहेब घोडके व चापोहवा गणेश मारडे असे पो. स्टे बीड ग्रामीण हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पो ह महेश जोगदंड एल सी बी बीड यांना गोपनीय माहिती मिळाली ही इसम नामे राहुल केरबा टुले रा.नवगण राजुरी याने त्याचे राहते नवीन बांधलेल्या घरात मोठ्या प्रमाणात गुटखा साठवून ठेवला आहे. या खातरीशीर माहिती वरून रेड पार्टी सह जाऊन रेड केली असता त्याचे कडून १) ११ गोण्या इगल ७१७ तंबाखू २) २३ गोण्या हिरा पानमसाला असा एकूण ४,०८,८४० रू चा मुद्देमाल मिळून आला आहे. नमूद आरोपी हा पोलिस ठाणे बीड ग्रामीण यांच्या ताब्यात देण्यात आला आहे.त्याचे विरुद्ध सरकार तर्फे फिर्याद देऊन गुन्हा दाखल करणे चालू आहे.

सदरची कामगिरी मा. श्री.नवनीत कॉवत, पोलीस अधीक्षक बीड, मा श्री सचिन पांडकर यांचे मार्गदर्शन खाली पो नी संतोष घोडके ,पोनी उस्मान शेख ,सपोनी विजयसिंह जोनवाल, पो उप नि महेश विघ्ने,,पो. हवा.महेश जोगदंड,तुषार गायकवाड, राजू पठाण/ ,चापोह गणेश मराडे/,पोशी बाप्पासाहेब घोडके यांनी मिळून केली आहे.



हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED- 431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT

# निर्लज्ज नगरपरिषद प्रशासनाची गुड मॉर्निंग ग्रुपने लाज राखली

## छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावरील तुटलेल्या जिमच्या साहित्याची स्वखर्चाने दुरुस्ती : डॉ. ढवळे

**बीड/प्रतिनिधी :** बीड शहरातील मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणांवर सकाळी आणि सायंकाळी व्यायाम करण्यासाठी येणाऱ्या नागरिकांना नगरपरिषद प्रशासनाने बसवलेले साहित्य मोडकळीस आले होते यामुळे व्यायाम करणारांची हेळसांड होत होती. मोडकळीस आलेल्या जिमच्या साहित्याची दुरुस्ती करण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रजासत्ताक दिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करून शासकीय ध्वजारोहणा साठी आलेले क्रिडा मंत्री दत्तात्रय भरणे यांना निवेदन दिले होते. निवेदन अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत नरेंद्र कुलकर्णी यांनी मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याबाबत लेखी कळवले होते. मात्र नेहमीप्रमाणेच नगरपरिषद प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले. व्यायामासाठी येणाऱ्या नागरिकांची हेळसांड लक्षात घेऊन गुड मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी सामाजिक बांधिलकी जपत पुढाकार घेत आणि स्वखर्चाने सगळ्या साहित्यांची दुरुस्ती करून घेतली.त्यामुळे एकंदरीतच निर्लज्ज नगरपरिषद प्रशासनाची गुड मॉर्निंग ग्रुपने लाज राखली अशी प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी दिली. गुड मॉर्निंग ग्रुपच्या या सामाजिक कार्याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

सविस्तर माहितीस्तव

बीड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या छत्रपती संभाजी महाराज क्रिडांगणावर सकाळी आणि सायंकाळी नागरीकांची गर्दी असते. व्यायामाच्या दृष्टीने अनेक नागरिक याठिकाणी येतात. अशा नागरीकांसाठी व्यायाम करण्यासाठी काही वर्षापुर्वी ओपन जिमचे साहित्य बसविण्यात आले होते. या साहित्याची कित्येक महिन्यांपासून मोडतोड झालेली होती.अनेक साहित्य मोडकळीस आलेले होते. त्यामुळे व्यायामासाठी आलेल्या नागरीकांची हेळसांड होत होती.

यासंदर्भात सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांच्या सहका- यांनी नगरपरिषद प्रशासनाला वारंवार लेखी निवेदन तसेच आंदोलनाद्वारे मोडकळीस आलेल्या साहित्याची दुरूस्ती करण्याची मागणी केली होती.मात्र नगरपरिषद प्रशासनाने याकडे दुर्लक्ष केले होते. गुड गुड मॉर्निंग ग्रुपच्या सदस्यांनी ही बाब लक्षात घेऊन सामाजिक बांधिलकी जपत स्वखर्चाने तुटलेल्या जिमच्या साहित्याची वेल्डिंगने दुरुस्ती केली.यासाठी ॲड.चंदुभाऊ जटाळ, जयदत्त थोटे,शरद जवळकर, ॲड.शिवाजी साळवे,राजुशेठ गोरे, घोगरे , संतोष पवार, दिनेश गुरखुदे, जितेंद्र कासट, आनंद बाहेती, किशोर कागदे,अलीमभाई, सुर्यवंशी, ढाकणे, अंकुश निर्मळ, अशोक सुरवसे, वानखेडे, मुकेश भस्मारे, कोठारी, मिसाळ,बाळु निकम,असत पटेल,राजु दळवी यांनी मोलाचे योगदान दिले.



-----------------

**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर**
**मो.नं.८१८०९२७५७२**

## विविध वृत्त...

### शिवरायांनी मॉ जिजाऊचं स्वराज्याचं स्वप्न पूर्ण केल

आजच्या तरुणांनी निर्व्यसनी राहून शिवचरित्रातून प्रेरणा घ्यावी: हभप प्रा निलेश महाराज कोरडे



**टाकरवन/प्रतिनिधी :** राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊनी स्वराज्याचं पाहिलेलं स्वप्न छत्रपती शिवाजी महाराजांनी पूर्ण केलं.शिवरायांना एकच व्यसन होतं ते म्हणजे फक्त रयतेच स्वराज्य उभे करायचे आणि म्हणून हे स्वराज्य निर्माण झाले.आजच्या तरुणांनी शिवचरित्रातून प्रेरणा घेत निर्वेशनी राहून आई वडिलांचे स्वप्न साकार करावे असा उपदेश ह भ प प्रा निलेश महाराज कोरडे यांनी टाकरवन या ठिकाणी केला.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कीर्तन सोहळ्यात दि.२२ शनिवार रोजी त्यांची कीर्तन सेवा पार पडली.

माजलगाव तालुक्यातील टाकरवन येथे सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विविध सामाजिक उपक्रमांनी पार पडली.शनिवार रोजी महाराष्ट्राचे सुप्रसिद्ध प्रबोधनकार ह भ प प्रा निलेश महाराज कोरडे यांचे कीर्तन आयोजित केले होते.छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कीर्तनास सुरुवात झाली. पुढे बोलताना निलेश महाराज म्हणाले.आदीलशाही मुगल शाहीच्या सुलतानी सत्तेतून रयत भयमुक्त करण्यासाठी.आया बहिणीचा अब्रुसाठी. राष्ट्रमाता मासाहेब जिजाऊनी स्वराज्याचं स्वप्न पाहिलं. छत्रपती शिवाजी महाराजांनी रयतेचे स्वराज्य उभे करून हे स्वप्न सत्यात उतरवलं. आयुष्यभर निर्व्यसनी राहून आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराज योवनांशी लढले.छत्रपतींचा हा धगधगता इतिहास आजही आम्हाला प्रेरणा देतो.आजच्या तरुण पिढीने शिवजयंतीच्या निमित्ताने एक वचन घ्यावे शिवचरित्रातून प्रेरणा घेऊन निर्व्यसनी राहून छोटे का होईना पण स्वतःचं कर्तुत्व सिद्ध करून आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करावे.हिच खरी शिवजंयती होईल असा उपदेश निलेश महाराज कोरडे यांनी पुढे बोलताना तरुणाईला केला.यावेळी गावातील महिला तरुण मुलं मुली मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उपक्रम यशस्वी करण्यासाठी सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या सदस्यांनी परिश्रम घेतले.

### कोरोना काळात रुग्णवाहीकेची सेवा देणाऱ्या वाहनधारकाचे थकीत बीले तात्काळ आदा करावीत...नसता शिवसेना स्टाईलने आंदोलन... शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते



**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यामध्ये प्रशासनाने कोव्हीड-१९ काळामध्ये जिल्हाधिकारी साहेब यांच्या आदेशाने वापरलेल्या खाजगी रूगनवाहिका व खाजगी वाहन यांच्या गाड्यांची मा. जिल्हा आरोग्य अधिकारी साहेब यांच्या कार्यालयाकडून बिले सण २०२० पासून थकीत आहेत.थकित बीले मिळावित यासाठी रुग्णवाहिका मालकांनी अनेक वेळा बीड जिल्हा संबंधित अधिकाऱ्यांशी पत्रव्यवहार केला,उपोषणे सुद्धा केली परंतु बिलाची थकीत रक्कम त्यांना मिळाली नाही. यामुळे त्यांच्यातील काही रुग्णवाहिका मालकांनी आज शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्र्वर सातपुते सर यांची भेट घेतली व हा सर्व प्रकार त्यांना कळवळा असता शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्र्वर सातपुते सर यांनी तात्काळ लगेचच बीड जिल्हा निवासी उपजिल्हाधिकारी स्वामी सर यांची भेट घेऊन वाहन मालकांचे सर्व थकीत बिले लवकरात लवकर अदा करण्यात यावेत असे निवेदन दिले. व सर्व बिले लवकरात लवकर जमा न केल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिवसेना स्टाईल आंदोलन करण्याचा इशारा यावेळी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्र्वर सातपुते सर यांनी दिला. यावेळी सोबत निकेश जगदाळे,सुभाष यादव,रमेश सुडे,कैलास धुमाळ, महेश मोरे, परमेश्र्वर बिल्पे, परमेश्र्वर मोरे, अशोक गिराम, दत्ता ढोंगे, अंगद कोथिंबीरे, राजेंद्र मोरे, अंबादास मोरे, मिठू नागरगोजे, हनुमंत नागरगोजे, पोपट वक्ते, बाळासाहेब वनवे सह सर्व उपस्थित होते...!!



## अपघातानंतर मोटर पेटून दोघांचा जळून मृत्यू

**अहिल्यानगर/प्रतिनिधी :** जामखेड शहरातील बीड रस्त्यावर चारचाकी मोटार रस्त्याच्या दुभाजकाला धडकल्यानंतर, मोटारीने पेट घेतला. या अपघातात जामखेड पोलिस ठाण्यातील कर्मचार्यासह आणखी एका तरुणाचा जळुन मुत्यू झाला. हा अपघात आज, सोमवारी पहाटे घडला.

धनंजय नरेश गुडवाल, (३५) व महादेव दत्ताराम काळे, (२८ वर्षे, रा. आदित्य मंगल कार्यालय शेजारी, बीड रस्ता जामखेड) अशी दोघा मृतांची नावे असल्याची माहिती जामखेड पोलिस ठाण्याचे निरीक्षक महेश पाटील यांनी दिली.

महादेव काळे व पोलीस कर्मचारी धनंजय गुडवाल हे दोघे आज पहाटे ४ च्या सुमारास मोटारीतून (एमएच १६ डीएम ३८५३) जामखेड शहराकडे येत होते. मोटार एका हॉटेलसमोरील दुभाजकाला धडकली व मोटारीने पेट घेतला. अत्याधुनिक पध्दतीमुळे मोटारीचे दरवाजे लॉक झाल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. त्यामुळे मोटारीतील दोघांना बाहेर पडता आले नाही. त्यातच दोघांचा मोटारीतच जळुन दुर्दैवी मुत्यू झाल्याचा अंदाज वर्तवला जातो.



म्हसोबावाडी फाटा ते सावरगाव या रस्त्यावरील दुरुस्तीचे नावाखाली पुन्हा थात्तुर मात्रुर खड्डे बुजवली असून भाविकांना या रस्त्यावरून जाताना मोठा त्रास सहन करावा लागत आहे तरी ज्या ठेकेदाराने काम केला आहे अशा ठेकेदारांना पुन्हा असे काम देऊ नयेत अशी मागणी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद चंद्र पवार गटाचे आष्टी तालुका उपाध्यक्ष अशोक शेठ मस्के यांनी केले आहे. छायाचित्र सुरेश कांबळे आष्टी

## अभ्यासापेक्षा ज्ञान श्रेष्ठ आहे - ह.भ.प.इंदुरीकर महाराज



**नवगण राजूरी/प्रतिनिधी :** किर्तनकाराने अभंगाचे चिंतन करायला पाहिजे. लिनता ठेवली तर व्यापार चांगला चालतो, व्यायामं केला तर शरीर चांगले राहिल. अभ्यास केला तर ज्ञान मिळेल, अभ्यासापेक्षा ज्ञान श्रेष्ठ आहे पण ज्ञानापेक्षा श्रेष्ठ देवाचे ध्यान आहे असे प्रतिपादन समाजप्रबोधनकार ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांनी केले.



बीड तालुक्यातील श्री क्षेत्र संगमेश्वर देवस्थान लिंबारूई येथे अखंड हरिनाम सप्ताह सुरू असुन या सप्ताहात रविवार दि.२३ रोजी ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख यांची किर्तन सेवा झाली. यावेळी शिवउपासक बालयोगी श्री संत भगवान बाबाजी, ह.भ.प.राजेंद्र महाराज तौर, ह.भ.प.भिमराव काळे महाराज, ह.भ.प.कचरू महाराज देवडे, ह.भ.प.राजाभाऊ महाराज तौर, ह.भ.प.सिध्देश्वर महाराज, ह.भ.प.वेदांत महाराज आदिंची प्रमुख उपस्थिती होती. ह.भ.प.निवृत्ती महाराज देशमुख यांनी किर्तनासाठी संत तुकाराम महाराजांच्या गाथेतील अभंग घेतला. किर्तन सांगतांना पुढे म्हणाले की, संसार कितीही करा दुःखच आहे परमार्थात सुख आहे. संसारातला अनुभव कधी कोणाला सांगू नये. परमार्थातील अनुभव सांगितल्याशिवाय रहायचे नाही. संसारातले दुःख सांगायचे नाही, परमार्थातील दुःख सांगितल्याशिवाय राहू नये. आम्ही किर्तनकार नाही, भगवंताचा निरोप देणारे पोस्टमन आहोत. संसार अपूर्णांक आहे तर परमार्थ पुर्णांक आहे. संसार कितीही करा दुःखच आहे, परमार्थात सुख आहे. काय करायचे ? ते ५० वर्षाच्या आतच करायचे, त्यानंतर परमार्थ करायचा. ६० च्या पुढचं जगणं लाचारीचं आहे. ५० पर्यंतचे वय उमेदिचे आहे. खिसा गरम आहे आणि अंगात ताकत आहे तोपर्यंतच खरं आहे. संसारातला अनुभव सांगायचा नाही, परमार्थातील अनुभव सांगायचां. चांगले काम करायचे त्याला त्रास सहन करावा लागतो. माणसाने कितीही चांगले काम केले तर काही नाही परंतू एखादे चुकीचे काम झाले तर त्यावर पाणी फेरलेच म्हणायचे. या जगात चांगला वागलात तर त्रास होणार. खरा बोलला की त्याचा कार्यक्रमच झाला म्हणायचां. ४० % मुले मोबाईलच्या आधीन गेले आहेत. १० % लोक शेअरमार्केटमुळे लयास गेले आहेत. यापुढे रात्रंदिवस कष्ट करणारा आणि निर्व्यसनीच चांगले जीवन जगू शकेल. चांगलं काम करता येत नसेल तर चांगले काम करणार्याला अडवे येऊ नका. दारू, जुगार, मोबाईलचा गैरवापर या तीन गोष्टी वाईट आहेत त्यापासून दुर रहा असे त्यांनी सांगितले. यावेळी भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## महाशिवरात्री निमित्त पिंपळेश्वर देवस्थानच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन

### आ.सुरेश धस यांच्या हस्ते आज रात्री महाभिषेक

**आष्टी/प्रतिनिधी:** सालाबादप्रमाणे याही वर्षी आष्टी शहरातील पिंपळेश्र्वर महादेव मंदिराच्या प्रांगणात महाशिवरात्री निमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून.आज मध्यरात्री देवस्थानाच्या वतीने आ.सुरेश धस यांच्या हस्ते महाभिषेक केला जाणार असल्याची माहिती देवस्थान समितीच्या वतीने देण्यात आली आहे.

आष्टी तालुक्यासह राज्यातील कानाकोपऱ्यातून महाशिवरात्री निमित्त शहरातील पिंपळेश्वर मंदिरामध्ये महादेवाच्या दर्शनासाठी मोठ्या संख्येने भाविकांची रीघ लागते.महाशिवरात्रीच्या पूर्वसंध्येला म्हणजेच मध्यरात्री याठिकाणी महादेवाला मंहाभिषेक घालण्यात येणार असून आ.सुरेश धस यांच्या हस्ते हा महाभिषेक केला जाणार आहे.बुधवारी पहाटे ४ ते ७ यावेळेत सार्वजनिक अभिषेक पार पडल्यानंतर सकाळी ७ वाजल्यापासून मंदिर




भाविकांच्या दर्शनासाठी खुले करण्यात येणार आहे.दिवसभर दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी उपवासाच्या निमित्ताने महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले आहे.शिवाय या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर यात्रा देखील या दिवशीच भरते. सायंकाळी ७ वाजता महाआरती संपन्न झाल्यानंतर मंदिरावर आकर्षक फटाक्यांची आतषबाजी केली जाणार आहे.गुरुवार दि.२७ रोजी दुपारी शहरातून पारंपरिक वाद्यासह पिंपळेश्र्वर महादेवाच्या प्रतिमेची भव्य शोभा यात्रा संपन्न होणार असून या सर्व कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन मंदिर समितीच्या वतीने करण्यात आले आहे

# दोन मोठ्या झाडांच्या फांद्यांमुळे ऐतिहासिक कारंजा टॉवरला धोका

## बीड नगर परिषद साध्या फांद्या छाटू शकत नाही का?

**बीड/प्रतिनिधी :** शहराच्या मध्यभागी असलेल्या ऐतिहासिक कारंजा टॉवर ला जवळच असलेल्या दोन मोठ्या झाडांच्या फांद्यांमुळे धोका निर्माण झाला आहे. असे असताना देखील त्या फांद्या छाटल्या जात नाहीयेत. म्हणून बीड नगर परिषद साध्या फांद्या छाटू शकत नाहीत का? असा उद्विग्न प्रश्न मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी उपस्थित केला आहे. ऐतिहासिक कारंजा टॉवरला बीड नगर परिषदेच्या तसेच जिल्हा प्रशासनाच्या अनास्थेमुळे, हलगर्जीपणामुळे, दुर्लक्षतेमुळे मोठ्या प्रमाणात अवकळा आली आहे. ही ऐतिहासिक वास्तू दुर्दशेत अडकली आहे. मात्र याकडे प्रशासकीय स्तरावर बघितलेच जात नसल्याने ही ऐतिहासिक वास्तू दारिद्र्याच्या फेऱ्यात अडकली आहे.



म्हणून याविषयी १४ फेब्रुवारी २०२५ रोजी निवेदन ही देण्यात आले आहे. तरीसुद्धा प्रशासनिक स्तरावर दखल घेतली जात नाही. हे चित्र पाहता कारंजा टॉवर परिसराजवळ तसेच अजिजपुरा आणि खंदक येथील ज्येष्ठ नागरिकांनी पुढे येत तरुणांना सोबत घेऊन कारंजा टॉवरच्या आवारातील सर्व घाण कचरा उचलून स्वच्छता केली. पाण्याच्या फवाऱ्यासाठी लावण्यात आलेल्या कारंजाच्या हौदालाही साफसूफ केले. कारंजा टॉवरचे सर्व आवार आणि हौद पाण्याने धुवून काढण्यात आले. जाहिरातीच्या डिजिटल फलकासाठी लावण्यात आलेले लोखंडी फ्रेम काढण्यात आले. नागरिक स्वतः पुढे येऊन करत असलेले हे कार्य सुद्धा प्रशासनाला दिसत नाही असे वाटते. म्हणूनच की काय प्रशासनाकडून अजूनही कारंजा टॉवरसाठी आवश्यक असलेली कामे केली जात नाहीत. जवळच असलेल्या दोन मोठ्या झाडांच्या फांद्या मोठ्या प्रमाणात कारंजा टॉवरला चिटकल्या असून त्याच्या दाबाने तसेच वारा सुटल्यास होणाऱ्या घर्षणाने कारंजा टॉवरच्या इमारतीला धोका निर्माण झाला आहे. परंतु बीड नगर परिषदेसह जिल्हा प्रशासनालाही याच्याशी काहीही देणे घेणे असल्याचे दिसत नाही. येथील दोन्ही झाडांच्या कारंजावर लोंबकळणाऱ्या फांद्या छाटणे आवश्यक असताना त्या छाटल्या जात नाही. म्हणून मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते रमेशराव गंगाधरे यांनी बीड नगर परिषद या फांद्या सुद्धा छाटू शकत नाही का? असा उद्विग्न प्रश्न उपस्थित केला आहे.

# बीड जिल्हयात दशहत निर्माण करुन गुन्हे करणाऱ्या चार गुंड हद्दपार

## एस पी नवनीत कॉवताची मोठी कारवाई



**बीड/प्रतिनिधी :** बीड जिल्हयाचे पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी बीड जिल्हयाचा कार्यभार स्वीकारल्यानंतर बीड जिल्हयात होत असलेल्या चोऱ्या, घरफोड्या, खुन व खुनाचा प्रयत्न, दंगा, जबरी चोऱ्या, दरोडा टाकणारे गुन्हेगार व लोकांना मारहान करुन गंभीर जखमी करुन जनतेमध्ये दहशत निर्माण करणारे बीड जिल्हयातील गुन्हेगारावर पोलीस अधीक्षक श्री नवनीत काँवत यांची करडी नजर आहे. असे गंभीर गुन्हे करणारे गुन्हेगारांच्या टोळयावर गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी त्यांचे विरुध्द जास्तीत जास्त उचित प्रतिबंधक कारवाया करणे बाबत पो.स्टे. प्रभारी अधिकाऱ्यांना सुचना दिलेल्या आहेत.

पो.स्टे. प्रभारी अधिकारी केज श्री. प्रशांत महाजन यांनी बीड व लगतचे जिल्हयात टोळीने गुन्हे करणारे इसम १. अजय अशोक तांदळे वय २३ रा.कोरेगांव ता.केज जि.बीड २. विकास सुभाष सावंत वय २८ रा. सावंतवाडी ता. केज जि.बीड ३. सोमनाथ राजाभाऊ चाळक वय २२ रा. लव्हुरी ता.केज जि. बीड ४. बालाजी राम लांब वय १९ रा. कोरेगांव ता. केज जि.बीड यांचे टोळीवर शरीरा विरुध्दचे व मालाविरुध्दचे गंभीर गुन्हे, जिवे मारण्याचा प्रयत्न करणे, दंगा करणे, जिवेमारण्याच्या धम्मक्या देणे, अवैध शस्त्र बाळगणे, जबरी चोरी करणारे, लोकांना मारहाण करुन जखमी करुन, गुंडगिरी करुन जनतेमध्ये दहशत निर्माण करणे असे गुन्हे दाखल असल्याने व त्यांची जनतेमध्ये दहशत निर्माण होत असल्याने सदर टोळीच्या गुन्हेगारी कृत्यांना आळा घालण्यासाठी व सदर टोळीची पांगा पांग करण्यासाठी त्यांचे टोळी विरुध्द महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे दि.२४.१०.२०२४ रोजी हद्दपार प्रस्ताव पोलीस अधिक्षक कार्यालयास सादर केला होता.

सदर प्रस्तावाची उप विभागीय पोलीस अधिकारी केज यांनी चौकशी पुर्ण केल्या नंतर पोलीस अधीक्षक बीड यांनी त्यांना दि. १०.०२.२०२५ व दि.२०.०२.२०२५ रोजी त्यांचे म्हणने मांडण्यास संधी देऊन व त्यांचे टोळीवरील गुन्हे, लोकांमधील दहशत, त्यांची गुन्हेगारी पार्श्र्वभुमी पाहुन, गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी व सदर टोळीची पांगा-पांग करणे साठी सदर टोळीस बीड, लातुर, धाराशिव जिल्हयाचे कार्यक्षेत्रातुन महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ५५ प्रमाणे दोन वर्षे कालावधीसाठी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत यांनी आज दि.२५.०२.२०२५ रोजी आदेश पारीत करुन हद्दपार केले आहे.

सदरची कामगिरी पोलीस अधीक्षक, बीड यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधिक्षक श्रीमती चेतना तिडके, उप विभागीय पोलीस अधिकारी तथा सहा. पोअ श्री. कमलेश मिना, पोनि श्री. प्रशात महाजन, पोनि श्री. वैभव पाटील, पो. स्टे केज, स्थानिक गुन्हे शाखा बीड चे पो.नि. श्री. उस्मान शेख, सपोउपनि- अभिमन्यु औताडे, पोह-गित्ते पो.स्टे केज पोशि- बिबिसेन चव्हाण यांनी केली आहे. भविष्यातही बीड जिल्हयात टोळीने गुन्हे करणारे गुन्हेगांरा विरुध्द व गुंडा विरुध्द कठोर भुमीका घेवुन MPDA, MCOCA तसेच हद्दपार अशा कारवाया करण्याचे संकेत पोलीस अधिक्षक नवनीत काँवत यांनी दिले आहेत.

## हक्काच्या माणसाचा सन्मान...




**आमचे जिवलग मित्र दैनिक आरंभ चे संपादक दीपक भाऊ थोरात यांनी अखिल भारतीय ग्रामीण पत्रकार संघाच्या जिल्हाध्यक्ष पदी निवड झाल्या बद्दल बीड प्रहार चे संपादक अशोक होळकर यांचा सन्मान करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या यावेळी सह संपादक उद्धव आरे यांची उपस्थिती होती.**



**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते तथा कन्हेरवाडीचे सरपंच राजेभाऊ फड यांच्या वतीने कन्हेरवाडी गावातील दत्तात्रय तुकाराम खांडे यांच्या मूलीच्या विवाहासाठी १0000 रू मदत करण्यात आली, यावेळी प्रल्हाद मुंडे पाटील, से.स.सो. व्हाइस. चेअरमन मिनीनाथ दादा फड, माजी उपसरपंच रामहारी फड, विजय मुंडे, बाबुराव फड, महादेव मामा मुंडे, रमेश फड, समाधान मुंडे आदि ग्रामस्थ उपस्थित होते.**

# पन्नास लाखांचे घर असणाऱ्यांना प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेचा लाभ

## विधवा, अपंग,खरे लाभार्थी योजनेपासून वंचित - बाबुराव गोळेकर

**सुनिल थोरात**

**माजलगा :** पुरुषोत्तमपुरी येथे प्रधानमंत्री आवास घरकुल योजनेचे काल प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. पण या योजनेपासून खरे लाभार्थी वंचित ठेवण्यात आलेले आहेत. ज्या लोकांचे उत्पन्न लाखो रुपयांच्या घरात आहे व ३०-४० एकर जमीन आहे,५० लाखांचे बंगले आहेत जे लोक टॅक्स भरतात अशा लोकांचे नावे प्रधानमंत्री घरकुल आवास योजनेमध्ये आलेले आहेत व त्यांना तसे प्रमाणपत्र देण्यात आले पण जे खरे लाभार्थी आहेत त्यात विधवा महिला असतील अपंग व्यक्ती असतील किंवा आत्महत्या ग्रस्त कुटुंब असतील अशांना वगळून मालदार व पैसेवाला लोकांनाच लाभ भेटत आहे. हा सामान्य लोकांवर केलेला अन्याय आहे असे बाबुराव गोळेकर यांनी सांगितले. तसेच अगोदर जो सर्वे झाला तो ग्रामसेवक व संबंधितांनी आर्थिक तडजोडीतून बोगस केलेला होता असा आरोप पुरुषोत्तमपुरी येथील नागरिक करत आहे. शासनाने या योजनेत जे खरे लाभार्थी आहेत त्यांना लाभ द्यावा अशी मागणी बाबुराव गोळेकर यांनी केली. या सगळ्या




प्रकारात ग्रामसेवक, प्रशासक व पंचायत समिती व्यवस्थापन या सर्व प्रकाराला जबाबदार आहेत या योजनेत जो बोगसपणा झालेला तो थांबवून जे वंचित लाभार्थी आहेत यांना लाभ द्यावा अन्यथा या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी बाबुराव गोळेकर यांनी दिला.

**करवसुलीच्या नावाखाली लाखो रूपयांचा भ्रष्टाचार ग्रामसेवक व शिपाई हे करत आहेत. ज्या लोकांना घरकुल आलेले आहेत त्या लोकांची कागदपत्रांसाठी व पी टी आर साठी अडवणूक केली जाते व तुमच्याकडे कर भरायचा बाकी आहे तो भरून घेतल्याशिवाय तुम्हाला पी.टी.आर मिळणार नाही असे ग्रामसेवक सांगतात व अडवणूक करतात मग लाभार्थी हे चार ते पाच हजार रुपये देतात पण त्यांना कराची पावती दिली जात नाही हे पैसे ग्रामसेवक वरल्यावरी ढापतात. लाभार्थी यांनी पावती मागीतली असता तुमच्या कडे जास्त कर आहे मग पूर्ण कर भरा तुम्हाला पावती देतो असे सांगतात. अशाप्रकारे नागरिकांची लूट केली जाते व यातून लाखो रुपयांचा भ्रष्टाचार केला जातो या प्रकरणाची बी.डी.ओ यांनी गांभीर्याने लक्ष घालून दखल घ्यावी व ग्रामसेवक आणि संबंधितांवर कारवाई करावी अशी मागणी करण्यात येत आहे.**

# शेतकरी हा महाराष्ट्राचा कणा आहे, म्हणून शेतकरी परिपूर्ण झाला पाहिजे : शेतकरी पुत्र व्याख्याते, गणेश फरताडे

**हनुमंत मात्रे**

**वडवणी :** वडवणी तालुक्यातील चिंचवन मध्ये शिवजयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. छत्रपती शिवाजी महाराजांच्या चौकाची सजावट करण्यात आली होती. भगवे झेंडे व फुलांनी आणि रांगोळी काढून चौकाची सजावट करण्यात आली होती . आकर्षक असा छत्रपती शिवबारायांचा चौक बनवण्यात आला होता .या कार्यक्रमासाठी गावातील सर्वधर्मसमभाव जपणारी सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येऊन शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून जय भवानी जय शिवाजी अशा प्रकारची घोषणाबाजी करून छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त २२ फेब्रुवारी २०२५ रोजी प्रसिद्ध व्याख्याते शेतकरी पुत्र गणेशजी फरताडे यांचे व्याख्यान झाले. व्याख्यानाच्या माध्यमातून गणेश फरताडे सर यांनी गावातील कार्यक्रमांमध्ये बोलतांना त्यांनी सांगितले की, शेतकरी हा देशाचा कणा आहे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात



देखील राजे शेतकऱ्याकडे त्यांचं खूप लक्ष होतं. शेतकऱ्यांच्या अडीअडचणीमध्ये छत्रपती शिवाजी महाराज शेतकऱ्यांना खूप मदत करायचे. शेतकऱ्यांची पाण्याची समस्या असेल वन्य प्राण्यांपासून शेतीचे रक्षण असेल अनेक योजनांसाठी छत्रपती शिवाजी महाराज शेतकऱ्यांना खूप मदत करायचे. अरे मागील ३५०,४०० वर्षापूर्वीची काळ पाहिला, आम्ही कोणाची तरी गुलामगिरी करीत होतो. कोणाच्यातरी परकीय पायांची टाच आमच्या छाताडावर नाचत होती. तिथच गरजला होता. निधड्या छातीचा ढाण्या वाघ आणी म्हणाला याद राखा, शेतकऱ्यांच्या देठालाही हात लावाल तर... या राजांनी आम्हाला त्यावेळेस सांगितल शेतकरी किती महत्वाचा आहे. पाण्याचे नियोजन व्यवस्थापन राज्यांनी कशा पद्धतीने केले यावर परखड असे मनोगत व्याख्यानाच्या माध्यमातून गणेशराव फरताडे यांनी व्यक्त केले.व्याख्यानांमधून शिवरायांचा इतिहास व शिवरायांचे कार्य आपल्या व्याख्यानाच्या माध्यमातून सांगितले.

कार्यक्रमासाठी लढा दुष्काळाची फाउंडेशनचे अध्यक्ष ॲड, राज पाटील, मंकावती शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बालाजी कोठुळे, चेअरमन समशेर भाई शेख, युवा नेते ईश्वर तांबडे, राष्ट्रवादीचे युवा नेते आबेद भाई शेख, सरपंच राजेश नेटके, प्राध्यापक नवनाथ गिलबिले सर ,माजी सरपंच बंडू नाना कोठुळे, युवा नेते राहुल बडे, अरुण बडे, अरुण कोठुळे, प्रताप मात्रे, लिंबा आप्पा मात्रे ,गणेश कोठुळे , बद्री नाना मात्रे तुषार नेटके तसेच शिवजयंती आयोजक कमिटी स्वप्नील मात्रे, अनंत कोठुळे, ज्ञानेश्र्वर गोजे, इसाक शेख, नितीन कोठूळे, पंकज कोठुळे, कृष्णा कोठूळे, धनंजय मात्रे,अखिल कोठूळे,बाबा कोठूळे, शिवाजी कोठूळे,अशोक मात्रे, शहादेव मात्रे, श्रीराम मात्रे, वाघा मात्र, धनंजय कोठूळे, व गावातील तसेच तालुक्यातील सर्व शिवप्रेमी भक्त या कार्यक्रमाला उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात जिजाऊ वंदना करण्यात आली. त्यानंतर दीपप्रज्वलन करून व छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पत्रकार हनुमंत मात्रे सर तर आभार शिवाजी कोठुळे यांनी केले अशा रीतीने शिवजयंतीचा सुंदर सोहळा चिंचवण नगरीत पार पडला....

# धारूर शहरात मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढण्यास सुरुवात

**धारूर/प्रतिनिधी :** छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नागरी रुग्णालय व काशिनाथ चौक ते कसबा हनुमान मंदिर या मुख्य रस्त्याचे नूतनीकरण करण्यात येत आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पाहणीत मुख्य रस्त्यावर अतिक्रमण असल्याचे दिसून आले हे काढण्यासाठी नगरपालिके कडून हे काढण्यासाठी अतिक्रमण धारकाना नोटीस देण्यात आल्या हे न काढलेली अतिक्रमणे काढण्यास दि.२५ फेब्रुवारी मंगळवार पासुन सुरुवात करण्यात आली आहे. रस्ता मोकळा श्र्वास घेत असुन रस्त्याचे मज़ूर काम सुरू होण्याच्या आशा निर्माण झाल्या आहेत.




नगरपरिषदेच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज चौक ते काशिनाथ चौकापर्यंत रस्त्या लगतच्या व्यवसायिकांना अतिक्रमण काढून घेण्याच्या सूचना यापुर्वीच केल्या आहेत. नगर परिषदेचे मुख्याधिकारी महेश गायकवाड यांनी आज दि.२५ मंगळवार रोजी सकाळी अकरा वाजण्याच्या सुमारास छत्रपती शिवाजी महाराज चौकात कर्मचाऱ्यांच्या फौजफाट्यासह प्रत्यक्ष अतिक्रमण काढण्यास सुरुवात केली. यावेळी रस्त्याच्या कडेला असलेल्या जुन्या नाल्यापर्यंतचे सर्व अतिक्रमण जेसीबी मशिनने पाडण्यात येत आहे. या रस्त्याचे काँक्रीट काम व नालीबांधकाम सार्वजनिक बांधकाम विभागाकडून करण्यात येणार आहे. तर पिण्याच्या पाण्याची पाईपलाईन नगर परिषद करणार आहे. सदर रस्त्याचे नालीबांधकाम हे भुमिगत होत असून लवकरात लवकर दर्जे दार काम पुर्ण करण्यासाठी नगर परिषद प्रशासन प्रयत्नशील असल्याची प्रतिक्रिया मुख्याधिकारी महेश गायकवाड यांनी दिली.

# गेवराई शहरातील राष्ट्रीय महामार्गावरील अतिक्रमणावर प्रशासनाचा हातोडा

**अचानक झालेल्या कारवाईमुळे लहान-मोठ्या व्यवसायिकांची ताराबंळ**

**---------**

**व्यवसायिकांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले**

**गेवराई/प्रतिनिधी :** शहरातील गेवराई-बीड राष्ट्रीय महामार्गाच्या दोन्ही बाजूला असलेली काही अतिक्रमणे सोमवारी (दि.२४) काढण्यात आली. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशावरून गेवराई नगर परिषदेच्या पथकाने ही कारवाई केली. अचानक झालेल्या कारवाईमुळे लहान-मोठ्या व्यवसायिकांची ताराबंळ उडाली आहे.

गेल्या काही दिवसांपासून गेवराई शहरामधील राष्ट्रीय महामार्गावरील दोन्ही बाजूच्या रस्त्यावर अतिक्रमण वाढले आहे. या ठिकाणी लहान-मोठ्या व्यावसायिकांची दुकाने असल्याने रहदारीस अडथळा निर्माण




झालेला होता. जिल्हाधिकाऱ्यांनी अतिक्रमणधारकांना तीन महिन्यापूर्वीच नोटीस देऊन अतिक्रमण काढण्याबाबत सूचना दिली होती. मात्र, अतिक्रमण धारकांनी त्या नोटीसला जुमानले नाही. अखेर या अतिक्रमणावर आज (सोमवारी) प्रशासनाचा हातोडा पडला. नगर परिषदेच्या अतिक्रमण पथकाने सकाळपासून महामार्गावरील अतिक्रमण काढण्यास सुरूवात केली. यामुळे वेळेत व्यवसायिकांना आपले साहित्य दुकानातून हलवता न आल्याने व्यवसायिकांना मोठ्या आर्थिक नुकसानीला सामोरे जावे लागले. जिल्हाधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानुसार बीड-जालना महामार्गावरील अतिक्रमण काढण्यास सुरूवात झाली आहे. नागरिकांनी नगरपरिषदला अतिक्रमण काढून सहकार्य करावे. जे अतिक्रमण काढण्यास सहकार्य करणार नाहीत, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल असे गेवराई नगरपरिषदेचे मुख्याधिकारी यांच्याकडून सांगण्यात आले होते.